पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५०१ दिनांक - ०७/०७/२०२३**

**खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर**

**मित्राचे अपहरण करून लॉजवर कोंडून ठेवून त्याच्या वडिलांकडे खंडणी मागणा-या आरोपींना खंडणी विरोधी पथक १ ने अटक करून अपहरित तरूणाची केली सुटका**

दिनांक ०६/०७/२०२३ रोजी खंडणी विरोधी पथक, पुणे शहर कडील **पोहवा सचिन अहिवळे** यांना त्यांच्या गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, बालाजीनगर धनकवडी पुणे येथे लॉजवर एका तरुणास त्याच्या मित्रांनी डांबून ठेवले असून त्याच्या वडिलांकडे पैश्याची मागणी करत आहेत.

मिळाली बातमीचा आशय प्रभारी अधिकरी पोलीस निरीक्षक अजय वाघमारे यांना सांगितला असता त्यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार खंडणी विरोधी पथकातील प्रभारी अधिकारी व अंमलदार यांनी बालाजीनगर धनकवडी पुणे येथील लॉजवर तरूणास कोंडून ठेवलेल्या ठिकाणाची गुप्त बातमीदारा मार्फत माहिती काढून सापळा रचून आरोपी नामे १) अभिजित राजेंद्र थोरात वय २० वर्षे, रा.- नारटगावदगडी ता. कर्जत, जि. अहमनगर, २) निखील रमेश कांबळे,वय ३१ वर्षे, रा. शिवंजली कॉलनी दत्तनगर,कात्रज, पुणे. व एकविधी संर्घग्रस्त बालक असे आरोपींच्या ताब्यातून तरूणाची सुटका केली.

फिर्यादी तरूणाकडे चौकशी केली असता, आरोपी व फिर्यादी हे एकमेकांना ओळखत असल्याचे समजते. आरोपींनी फिर्यादीस दि.२९/०६/२०२३ रोजी पासून कात्रज, धनकवडी परिसरातील वेगवेगळ्या लॉजवर नेवुन आरोपी व त्यांचे इतर साथीदारांनी फिर्यादींचे हात पाय बांधुन डांबुन ठेवुन फिर्यादीस हाताने व लाकडी काठीने मारहाण केली व त्याच दरम्यान फिर्यादी व त्यांचे कुटुंबातील लोकांना जीवे ठार मारहाण करण्याची धमकी देवुन, फिर्यादीच्या वडीलांकडे २ लाख ५० हजार रुपयांची खंडणीची मागणी केली असल्याचे सांगितल्याने नमूद आरोपी व त्यांच्या इतर साथीदारांविरूद्ध सहकारनगर पो स्टे गुरनं १५८/२०२३, भादवि ३६४(अ), ३८६, ३८७, ३२३, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी अभिजित राजेंद्र थोरात व निखील रमेश कांबळे यांना सदर गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आलेली आहे. यातील अटक आरोपींनी फिर्यादीच्या ओळखीच्या व्यक्तीस नोकरी लावण्याकरीता अंदाजे २.५ ते ३ लाख रूपये दिले असल्याचे प्राथमिक तपासात समजले. त्यात त्यांची फसवणुक झाल्याने आरोपींनी फिर्यादीचे अपहरण करून त्यांना पुणे येथील एका लॉजवर आणुन त्यांस डांबुन ठेवले व मारहाण करून पैशाची मागणी केली असल्याचे निष्पन्न होत आहे. पुढील तपास सपोनि अभिजीत पाटील, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर हे करत आहेत.

**सदरची कारवाई मा. पोलिस आयुक्त श्री.रितेशकुमार, मा. सह पोलिस आयुक्त श्री.संदिप कर्णिक,अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त - १, गुन्हे, श्री.सुनिल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अजय वाघमारे, श्री.प्रताप मानकर,सपोनि अभिजीत पाटील, पोलीस अंमलदार सचिन अहिवळे, प्रविण ढमाळ, सुरेंद्रजगदाळे,सैदोबाभोजराव, राजेंद्र लांडगे, अमर पवार, पवण भोसले, नितीन कांबळे, दुर्योधन गुरव, विजय कांबळे यांनीकेली आहे.**